सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

महाराष्ट्र

## सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५

# मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९

( दिनांक ४ फेब्रुवारी, २००६ पर्यंत सुधारित )

Maharashtra

## *Bombay Act No. XV Of 1949*

# THE ~~BOMBAY~~ NURSING HOME REGISTRATION ACT, ~~1949~~

*(As modified upto the 4th February, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांनी भारतात मुद्रित केले आणि
संचालक, मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६.

[किंमत : ३.०० रु.]

# मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९

अनुक्रमणिका


उद्देशिका.

कलमे.

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ ... ... ... ... ...

२. व्याख्या. ... ... ... ... ...

३. नोंदणीवाचून शुश्रूषा-गृह चालविण्यास प्रतिषेध. ... ... ...

४. नोंदणीसाठी अर्ज. ... ... ... ... ...

५. नोंदणी. ... ... ... ... ...

६. नोंदणी करून न घेतल्याबद्दल शास्ति ... ... ... ...

७. नोंदणी रद्द करणे. ... ... ... ... ...

८. नोंदणी करण्याचे नाकारणे किंवा ती रद्द करणें याबद्दल नोटीस. ...

९. शुश्रूषा-गृहांची तपासणी. ... ... ... ... ...

१० स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यांना मिळणारा पैसा. ... ... ...

११. स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याचा खर्च. ... ... ... ...

१२. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल शास्ति. ... ... ...

१३. संस्थांनी केलेले अपराध. ... ... ... ... ...

१४. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यास सक्षम असलेले न्यायालय.

१५. या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींना निरस्तारण. ... ...

१६. नियम. ... ... ... ... ...

१७. उपविधि. ... ... ... ... ...

१८. व्यावृत्ती. ... ... ... ... ...

## [सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५][१]

[ मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ ]†

( ६ मे, १९४९ )

या अधिनियमात विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले आहेत.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ याद्वारे फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे अनुकूलन व फेरबदल करण्यात आले आहेत.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याद्वारे सुधारणा करण्यात आली आहे.

### [२][ मुंबई राज्यातील ] शुश्रूषा-गृहांची नोंदणी व तपासणी करण्यासाठी आणि तत्संबंधी काही गोष्टींसाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई प्रांतातील शुश्रूषा-गृहांची नोंदणी व तपासणी करण्यासाठी आणि तत्संबंधी काही गोष्टींसाठी तरतूद करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव,व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ असे म्हणावे.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९

[३][(२) हे कलम संपूर्ण [४][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे. या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ३ अन्वये घटित केल्याप्रमाणे बृहन्मुंबईस, [५][पुणे शहर], नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये घटित केल्याप्रमाणे नागपूर शहर व सोलापूर बरो नगरपालिकांच्या हद्दीतील क्षेत्रास लागू होतील ; आणि राज्य शासनास राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर क्षेत्रास उक्त तरतूद लागू होईल असा निदेश देण्याचा अधिकार असेल.]

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल. [६][राज्य] शासनास राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी, पोट-कलम (२) अन्वये ज्या कोणत्याही क्षेत्रास लागू असतील किंवा लागू करण्यात आल्या असतील त्या क्षेत्रात अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा, तारखेस अंमलात येतील असा निदेश देण्याचा अधिकार आहे.

---

[१] उद्देश व कारणे याच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९४९, भाग पाच, पृष्ठ ८४ पहा.

† हा अधिनियम मुंबई राज्याच्या भागाला लागू होता. १९५९ चा मुंबई ४२ च्या प्रारंभापूर्वी लागू होणार नाही (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याचे कलम २७ पहा.)

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ३ याद्वारे "मुंबई प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ४ याद्वारे मूळ मजकूराऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील आदेशाद्वारे "पुणे शहर व अहमदाबाद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

व्याख्या २. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात,— १९५४

(१) ''उपविधि'' याचा अर्थ, स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने केलेले उपविधि असा आहे ; चा मुंबई १४.

[१][(१-क) नगरपालिकेच्या क्षेत्राव्यतिरिक्त कोणत्याही, इतर क्षेत्राच्या संबंधात ''जिल्हा स्थानिक मंडळ'' या संज्ञेचा अर्थ, जिल्हा स्थानिक मंडळ, जिल्हा मंडळ, जिल्हा पंचायत किंवा जनपद सभा किंवा अशा प्राधिकारी संस्थांच्या रचनेसंबंधी तत्काली अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये स्थापन करण्यात आलेली आणि अशा क्षेत्रावर क्षेत्राधिकार असलेली तशा प्रकारची स्थानिक प्राधिकारी संस्था, असा आहे];

[२][''(२) ''स्थानिक पर्यवेक्षी प्राधिकारी'' याचा अर्थ,—

(एक) महानगरपालिकांच्या अधिकारितेत मोडणाऱ्या क्षेत्रामध्ये संबंधित महानगरपालिकेचा आरोग्य अधिकारी ;

(दोन) नगर परिषदेच्या अधिकारितेत मोडणाऱ्या क्षेत्रांमध्ये अशी परिषद ज्या जिल्हामध्ये असेल त्या जिल्ह्याचा जिल्हा शल्यचिकित्सक ;

(तीन) कटक क्षेत्रांच्या अधिकारितेत मोडणाऱ्या क्षेत्रामध्ये संबंधित कटक क्षेत्राचा आरोग्य अधिकारी ;

(चार) वरील उप-खंड (एक), (दोन) व (तीन) मध्ये न मोडणाऱ्या क्षेत्रांमध्ये संबंधित जिल्हा परिषदेचा जिल्हा आरोग्य अधिकारी ; '' ]

(३) '' प्रसुति-गृह '' याचा अर्थ, गरोदर स्त्रियांना किंवा प्रसूत होण्याच्या बेतात असलेल्या किंवा नुकत्याच प्रसूत झालेल्या स्त्रियांना दाखल करून घेण्याकरिता वापरण्यात येणारी किंवा जी वापरण्याचा हेतू आहे अशी कोणतीही जागा, आहे असा;

[३][''(३-क) ''नगरपालिका'' या संज्ञेचा अर्थ, महानगरपालिका, नगरपालिका, नगर समिती, शहर समिती, किंवा अशा प्राधिकारी संस्थांच्या रचनेसंबंधी तत्काली अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये स्थापन करण्यात आलेली, तशा प्रकारची स्थानिक प्राधिकारी संस्था आणि 'नगरपालिका क्षेत्र'या संज्ञेचा अर्थ, नगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रातील स्थानिक क्षेत्र, असा आहे.; '']

(४) ''शुश्रूषा-गृह'' याचा अर्थ असा आहे की, कोणतीही दुखापत झालेल्या किंवा कोणताही आजार किंवा दुर्बलता आलेल्या व्यक्तींना दाखल करून घेण्यासाठी आणि त्यांच्या औषधोपचाराची व शुश्रूषेची व्यवस्था करण्यासाठी वापरण्यात येणारी किंवा जी वापरण्याचा हेतू आहे अशी कोणतीही जागा, असा आहे; आणि त्यात प्रसुति-गृहाचा समावेश होतो ; आणि '' शुश्रूषा-गृह '' चालविणे या शब्द प्रयोगाचा अर्थ, शुश्रूषा-गृहांत व्यक्तींना वर सांगितलेल्या कोणत्याही कारणासाठी दाखल करून घेणे आणि त्यांच्या औषधोपचाराचा किंवा शुश्रूषेची व्यवस्था करणे, असा आहे.

(५) '' विहित '' याचा अर्थ असा आहे की, अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

(६) '' अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी'' याचा अर्थ असा आहे की, मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिअन्वये नोंदलेला वैद्यक व्यवसायी, असा आहे ; १९४२ चा मुंबई ६.

[४][(७) ''अर्हताप्राप्त सूतिका'' याचा अर्थ, मुंबईचा परिचारिका सूतिका आणि आरोग्य अवेक्षिकांबाबत अधिनियम, १९५४ अन्वये किंवा तत्काली अंमलात असलेल्या इतर कोणत्याही तत्सम विधिअन्वये नोंदलेली किंवा नोंदण्यात आली आहे असे समजण्यात आलेली सूतिका, असा आहे. १९५४ चा मुंबई १४.

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ५(१) याद्वारे खंड (१क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २, द्वारे मूळ मजकुराऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ५(२) याद्वारे खंड (३-क) समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ५(३) याद्वारे मुळ मजकुराऐवजी खंड (७) व (८) दाखल करण्यात आला.

१९५४ चा मुंबई १४. (८) 'अर्हताप्राप्त परिचारिका' याचा अर्थ, मुंबईचा परिचारिका सूतिका आणि आरोग्य अवेक्षिकांबाबत अधिनियम, १९५४ अन्वये किंवा तत्काली अंमलात असलेल्या इतर कोणत्याही तत्सम विधीन्वये नोंदलेली किंवा नोंदण्यात आली आहे असे समजण्यात आलेली परिचारिका, असा आहे;]

(९) ''नोंदणी करणे'' या शब्दाप्रयोगाचा अर्थ, या अधिनियमांचे कलम ५ या अन्वये नोंदणी करणे, असा आहे; आणि ''नोंदणी केलेला'' व ''नोंदणी'' या शब्दप्रयोगांचा अर्थ त्यानुसार लावला जाईल.

(१०) ''नियम'' याचा अर्थ, अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

**३.** कोणत्याही व्यक्तीची शुश्रूषा-गृहाच्या संबंधात योग्यरीतीने नोंदणी झाली नसेल तर आणि त्याची नोंदणी झालेली असल्यास, ती नोंदणी कलम ७ अन्वये रद्द करण्यात आली असेल तर, त्याला असे शुश्रूषा-गृह चालविता येणार नाही : नोंदणी वाचून शुश्रूषा-गृह चालविण्यास प्रतिषेध.

परंतु, जर एखादे शुश्रूषा-गृह [1][कलम ३ त्या क्षेत्रात अंमलात आल्याच्या दिनांकास अशा कोणत्याही क्षेत्रात अस्तित्वात असेल तर,] अशा दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत किंवा कलम ४ च्या तरतुदीस अनुसरुन अशा मुदतीच्या आत नोंदणीसाठी अर्ज करण्यात आला असेल तर, अशा अर्जाची अखेरची विल्हेवाट लावण्यात येईपर्यंत त्या शुश्रूषा-गृहाच्या बाबतीत या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

**४.** (१) शुश्रूषा-गृह चालविण्याचा ज्याचा हेतू आहे अशा प्रत्येक व्यक्तीने प्रत्येक वर्षी नोंदणीसाठी किंवा नोंदणीचे-नवीकरण करून घेण्यासाठी स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे : नोंदणी-साठी अर्ज.

परंतु, एखादे शुश्रूषा-गृहे जर [2][कलम ३ त्या क्षेत्रात अंमलात आल्याच्या दिनांकास अशा कोणत्याही क्षेत्रात अस्तित्वात असेल तर,] त्याच्या बाबतीत अशा दिनांकापासून तीन महिन्यांच्या आंत नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे.

(२) नोंदणीसाठी किंवा नोंदणीचे नवीकरण करून घेण्यासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज विहित करण्यात येईल अशा दिनांकास व अशा नमुन्याप्रमाणे केला पाहिजे व त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी पाठविली पाहिजे.

**५.** (१) हा अधिनियम व नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून, स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने, नोंदणीसाठी करण्यात आलेला अर्ज मिळाल्यावर, अर्जात नामनिर्दिष्ट केलेल्या शुश्रूषा-गृहाच्या संबंधात अर्जदाराची नोंदणी केली पाहिजे ; आणि त्यास विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र दिले पाहिजे : नोंदणी.

परंतु,—

(क) अर्जदार किंवा त्याने नेमलेली कोणतीही व्यक्ती वयोमानामुळे किंवा इतर कारणामुळे अर्जात दिलेल्या वर्णनाचे शुश्रूषा-गृह चालविण्यास किंवा त्यात नेमला जाण्यास लायक नाही ; किंवा

[3]["(ख) शुश्रूषा-गृह, अशा व्यक्तीच्या व्यवस्थापनाखाली नाही की जिने वैद्यक शास्त्राची पदवी धारण केली आहे व जी अशा शुश्रूषा-गृहामध्ये राहते किंवा शुश्रूषा-गृहामध्ये कामावर नेमलेल्या अर्हतापात्र परिचारिकांची संख्या तिथे असलेल्या रुग्णांच्या संख्येच्या विहित प्रमाणानुसार नाही ; किंवा

---

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम याच्या कलम ६ द्वारे ''या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेस अस्तित्वात असेल तर'' या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे ''या अधिनियमाच्या सुरवातीच्या तारखेस अस्तित्वात असेल तर'' या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[3] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(क)(एक) याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(ग) प्रसूति-गृहाच्या बाबतीत, अशा गृहाच्या सेवकवर्गात अर्हताप्राप्त सूतिका नाही ; किंवा

[१][(ग-१) शुश्रूषा-गृहाच्या जागेचे क्षेत्र हे विहित क्षेत्रापेक्षा कमी आहे ;

(ग-२) शुश्रूषा-गृहामध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या विहित केलेल्या खाटांच्या संख्येपेक्षा अधिक आहे ;

(ग-३) शुश्रूषा-गृह, शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याच्या स्वतःच्या मालकीचे आहे किंवा त्याच्या व्यवस्थापनाखाली आहे ;]

(ङ) शुश्रूषा-गृह किंवा त्यासाठी वापरण्यात येणारी कोणतीही जागा ही, स्थळ, बांधणी, राहण्याची सोय, सेवकवर्ग किंवा साधनसामग्री या दृष्टीने विचार करता, अर्जात दिलेल्या वर्णनाच्या शुश्रूषा-गृहासाठी वापरण्यास योग्य नाही किंवा त्यांचा उपयोग कोणत्याही प्रकारे अयोग्य किंवा अनिष्ट अशा प्रयोजनाकरिता करण्यात येत आहे किंवा करावयाचे योजिले आहे.

अशी स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याची खात्री झाली तर, त्यास अर्जदाराची नोंदणी करण्याचे नाकारण्याचा अधिकार असेल.

[२][ "(२) या कलमान्वये दिलेले नोंदणी प्रमाणपत्र हे, कलम ७ च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या दिनांकास ते देण्यात आले किंवा यथास्थिती, त्याचे नवीकरण करण्यात आले त्या दिनांकाच्या लगतनंतर येणाऱ्या तिसऱ्या वर्षाच्या ३१ मार्च या दिनांकापर्यंत अंमलात राहील व तोपर्यंत ते वैध असेल" ]

(३) शुश्रुषा-गृहाच्या बाबतीत दिलेले नोंदणीचे प्रमाणपत्र अशा शुश्रूषा-गृहाच्या ठळक जागी लावून ठेवण्यात आले पाहिजे.

नोंदणी न केल्याबद्दल शास्ती.

[३]["**६.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ३ च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील."]

नोंदणी रद्द करणे.

**७.** कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही शुश्रूषा-गृहाच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यास ज्या कारणावरून नाकारता आला असता त्या कारणावरून किंवा अशा व्यक्तीस या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले आहे या कारणावरून किंवा अशा शुश्रूषा-गृहाच्या बाबतीत कोणत्याही इतर व्यक्तीस दोषी ठरविण्यात आले आहे या कारणावरून अशा स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यास या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, अशा व्यक्तीची अशा शुश्रूषा-गृहाच्या बाबतीत झालेली नोंदणी कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार असेल.

नोंदणी करण्याचे नाकारणे किंवा ती, रद्द करणे याबद्दल नोटीस.

**८.** (१) नोंदणीसाठी केलेला अर्ज नाकारण्याबाबत किंवा कोणतीही नोंदणी रद्द करण्याबाबत आदेश देण्यापूर्वी, स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने, असा आदेश देण्याचा आपला हेतू असल्याबद्दलची निदान एक कॅलेंडर महिन्याची नोटीस यथास्थिति, अर्जदारास किंवा नोंदलेल्या व्यक्तीस दिली पाहिजे ; आणि अशा प्रत्येक नोटिशीत ज्या कारणावरून असा आदेश देण्याचा स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याचा हेतू आहे ती कारणे नमूद केली पाहिजेत. तसेच अशा नोटिशीद्वारे असे कळविण्यात आले पाहिजे की, अर्जदार किंवा नोंदलेली व्यक्ती त्यास नोटीस मिळाल्यानंतर एक कॅलेंडर महिन्याच्या आत तसे करण्याची आपली इच्छा आहे असे स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यास लेखी कळवील तर, असा प्राधिकारी असा आदेश देण्यापूर्वी त्यास असा आदेश का देण्यात येऊ नये याबद्दल (व्यक्तीशः किंवा प्रतिनिधीमार्फत) कारण दाखविण्याची त्यास संधी देईल.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(क)(दोन) याद्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) याद्वारे हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ याद्वारे हे कलम दाखल करण्यात आले.

(२) वर सांगितल्याप्रमाणे अर्जदारास किंवा नोंदलेल्या व्यक्तीस कारण दाखविण्याची संधी दिल्यानंतर जर स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकारी यथास्थिती, नोंदणीसाठी केलेला अर्ज नाकारण्याचे किंवा नोंदणी रद्द करण्याचे ठरवील तर, त्याने त्या अर्थाचा आदेश दिला पाहिजे ; आणि त्याची प्रत अर्जदारास किंवा नोंदलेल्या व्यक्तीस नोंदणीकृत डाकेने पाठविली पाहिजे.

(३) नोंदणीसाठी केलेला अर्ज नाकारण्याबाबत किंवा कोणतीही नोंदणी रद्द करण्याबाबत दिलेल्या आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, त्यास आदेशाची प्रत ज्या तारखेस पाठविण्यात आली त्या तारखेनंतर एक कॅलेंडर महिन्याच्या आत अशा आदेशाविरुद्ध [1][राज्य] शासनाकडे अपील करण्याचा अधिकार आहे. अशा कोणत्याही अपिलावर [1][राज्य] शासनाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(४) असा कोणताही आदेश तो ज्या दिनांकास देण्यात आला त्या दिनांकापासून एक कॅलेंडर महिन्याची मुदत संपेपर्यंत किंवा अशा आदेशाविरुद्ध अपील करण्याबद्दलची नोटीस देण्यात आली असेल तेव्हा अशा अपिलाचा निर्णय करण्यात येईपर्यंत किंवा ते मागे घेण्यात येईपर्यंत अमलात येणार नाही.

**शुश्रूषा-गृहाची तपासणी.**

९. (१) स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याच्या आरोग्य अधिकाऱ्याला किंवा ज्या जिल्ह्यात शुश्रूषा-गृह असेल त्या जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जनला किंवा स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने किंवा सिव्हिल सर्जनने याबाबत योग्यरीतीने अधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याला स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकारी, जे सामान्य किंवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून, शुश्रूषा-गृहासाठी, वापरण्यात येत असेल किंवा वापरण्यात येत आहे असे त्या अधिकाऱ्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही जागेत सर्व वाजवी वेळी प्रवेश करण्याचा व तिची तपासणी करण्याचा, तसेच या अधिनियमांच्या तरतुदींना अनुसरुन जे कोणतेही कागदपत्र ठेवणे आवश्यक आहे अशा कागदपत्रांची तपासणी करण्याचा अधिकार असेल :

परंतु, शुश्रूषा-गृहातील कोणत्याही रोग्यासंबंधी ठेवलेल्या कोणत्याही चिकित्साविषयक कागदपत्रांची तपासणी करण्यास अशा अधिकाऱ्याला या कलमांतील कोणत्याही तरतुदीवरून अधिकृत करण्यात आले आहे, असे समजता कामा नये.

(२) जर कोणतीही व्यक्ती, कोणत्याही अशा अधिकाऱ्यास वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही अशा जागेत प्रवेश करू देण्याचे किंवा तिची तपासणी करू देण्याचे नाकारील किंवा वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही अशा कागदपत्राची तपासणी करू देण्याचे नाकारील किंवा कोणत्याही अशा अधिकाऱ्यास या कलमान्वये त्याचे अधिकार बजावितांना अडथळा करील तर, तो या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल दोषी आहे, असे समजले पाहिजे.

**स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यांना मिळणारा पैसा.**

१०. या अधिनियमान्वये मिळालेल्या कोणत्याही फीच्या रकमा, स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याच्या निधीत जमा केल्या पाहिजेत.

**स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यांचा खर्च.**

११. कोणत्याही नगरपालिका निधीसंबंधीच्या किंवा स्थानिक निधींसंबंधीच्या कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने हा अधिनियम व नियम व उपविधि याअन्वये किंवा त्यांच्या प्रयोजनाकरिता केलेला सर्व खर्च, यथास्थिति, नगरपालिका निधीतून किंवा स्थानिक निधींतून देण्यात आला पाहिजे.

---

[1] विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

या अधिनियिमा-खालील अपराधांबद्दल शास्ती.

१२. जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, अशा उल्लंघनाबद्दल या अधिनियमात किंवा नियमात इतरत्र कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आली नसेल तर, जास्तीत-जास्त [१][पाच हजार रुपये] द्रव्य दंडाची शिक्षा होईल; आणि अपराध चालू राहिल्याचे बाबतीत अशा दोष सिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल त्यास आणखी [२][पन्नास रुपये] दंडाची शिक्षा होईल.

संस्थांनी केलेले अपराध.

१३. जेव्हा या अधिनियमाखालील अपराध करणारा व्यक्ती ही, एखादी कंपनी किंवा इतर एक व्यक्तिभूत संस्था किंवा व्यक्तींचा संघ (मग तो संस्थापित असो वा नसो) असेल तेव्हा, असा अपराध घडल्याचे वेळी जो कोणी तिचा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस, अभिकर्ता किंवा तिच्या व्यवस्थेशी संबंध असलेला इतर अधिकारी किंवा व्यक्ती असेल तो, अपराध आपल्या नकळत किंवा संमतीवाचून घडला असे सिद्ध न करील तर, असा अपराध केल्याबद्दल दोषी आहे असे समजले जाईल.

या अधिनियिमा-खालील अपराधांची न्यायचौकशी करण्यास सक्षम असलेले न्यायालय.

१४. प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशाच्या किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेता येणार नाही किंवा त्याची न्यायचौकशी करता येणार नाही.

या अधिनियिमा-अन्वये काम करणाऱ्या व्यक्तींना निस्तारण.

१५. हा अधिनियम, नियम किंवा उपविधि याअन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा हेतू आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम.

१६. (१) [३][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही प्रयोजन पार पाडण्याकरिता नियम करण्याचा अधिकार असेल.

(२) पूर्वगामी तरतुदीच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता, अशा नियमाअन्वये पुढील गोष्टी विहित करता येतील.—

(क) कलम ४, अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना;

(ख) नोंदणीसाठी किंवा नोंदणीचे नवीकरण करून घेण्यासाठी ज्या दिनांकास अर्ज करावयाचा तो दिनांक आणि अशा नोंदणीबद्दल किंवा नोंदणीचे नवीकरण करून घेण्याबद्दल द्यावयाची फी;

[४][परंतु, राज्य शासनास शुश्रूषा-गृहांच्या नोंदणीकरिता ते शुश्रूषा-गृह ज्या क्षेत्रामध्ये आहे, ते क्षेत्र, अशा शुश्रूषा-गृहांमध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या, तिथे करण्यात येणारे विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेऊन फी चे निरनिराळे दर विहित करता येतील.]

(ग) कलम ५ अन्वये द्यावयाच्या नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना;

(घ) जिच्यासाठी या अधिनियमात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही व राज्य शासनाच्या मते जिच्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे अशी कोणतीही इतर गोष्ट.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५ (क) याद्वारे "पन्नास रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख) याद्वारे "पंधरा रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ६ द्वारे हे "परंतुक" समाविष्ट करण्यात आले.

(३) या कलमाअन्वये अधिकार चालवून नियम करण्यापूर्वी ते राजपत्रात आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील.

**१७.** (१) स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यास, पुढील गोष्टींसाठी हा अधिनियम किंवा नियम यांच्याशी विसंगत नसतील असे उपविधि करण्याचा अधिकार असेल. उपविधी.

(क) शुश्रूषा-गृहात दाखल करून घेतलेल्या रोग्यासंबंधी ठेवावयाचे कागदपत्र आणि प्रसूति-गृहाच्या बाबतीत शुश्रूषा-गृहांत घडून आलेले गर्भस्त्राव किंवा गर्भपात किंवा मृतावस्थेत जन्मलेली मुले यासंबंधी तसेच, त्यांत जन्मलेली मुले व अशा जन्मलेल्या मुलापैकी त्याचे आई-बाप, पालक किंवा नातेवाईक यांच्या ताब्यात दिलेल्या किंवा स्वाधीन केलेल्या मुलांव्यतिरिक्त प्रसूतिगृहातून इतरत्र पाठविण्यात आलेली मुले यासंबंधी ठेवावयाचे कागदपत्र विहित करणे;

(ख) शुश्रूषा-गृहात घडून आलेल्या कोणत्याही मृत्यूची खबर देण्यास भाग पाडणे.

(२) स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही उपविधीत अशी तरतूद करता येईल की, अशा उपविधीचा भंग केल्यास त्याबद्दल :—

(क) जास्तीत जास्त पन्नास रुपये द्रव्यदंडाची शिक्षा होईल; अथवा

(ख) जास्तीत जास्त पन्नास रुपये द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उल्लंघन चालू राहिल्याचे बाबतीत असे, पहिले उल्लंघन केल्याबद्दल झालेल्या दोषसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी जास्तीत जास्त पंधरा रुपये द्रव्यदंडाची शिक्षा होईल ; अथवा

(ग) उपविधीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस तिने असे उल्लंघन करण्याचे बंद करावे याविषयी स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याकडून नोटीस मिळाल्यानंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल जास्तीत जास्त पंधरा रुपये द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्याने केलेला कोणताही उपविधि, तो [१][राज्य] शासनाकडून फेरबदलांनिशी किंवा फेरबदलांशिवाय कायम करण्यात येईपर्यंत, अंमलात येणार नाही.

(४) या कलमान्वये केलेले सर्व उपविधि राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत.

**१८.** या अधिनियमांतील कोणतीही तरतूद,— बचाव.

(१) राज्य शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याकडून किंवा राज्य शासनाने याबाबत पसंत केलेल्या कोणत्याही इतर मंडळीकडून चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही शुश्रूषा-गृहास; आणि

(२) भारतीय वेड्याबाबत अधिनियम; १९१२ च्या अर्थानुसार, वेड्या व्यक्तींसाठी किंवा मानसिक रोग असलेल्या रोग्यांसाठी असलेल्या कोणत्याही रुग्णालयास, लागू असणार नाही.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

# BOMBAY ACT No. XV OF 1949.

## THE MAHARASHTRA NURSING HOMES REGISTRATION ACT.

*(As modified up to the 7th May 2013)*

PRINTED IN INDIA BY THE MANAGER, GOVERNMENT PHOTOZINCO PRESS, PUNE AND PUBLISHED BY THE DIRECTOR, GOVERNMENT PRINTING AND STATIONERY, MAHARASHTRA STATE, MUMBAI - 400 004.

**2013**

**[ Price—Rs. 23/- ]**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

# BOMBAY ACT No. XV OF 1949.

## THE MAHARASHTRA NURSING HOMES REGISTRATION ACT.

*(As modified up to the 7th May 2013)*

PRINTED IN INDIA BY THE MANAGER, GOVERNMENT PHOTOZINCO PRESS, PUNE
AND PUBLISHED BY THE DIRECTOR, GOVERNMENT PRINTING AND STATIONERY,
MAHARASHTRA STATE, MUMBAI - 400 004.

**2013**

# THE MAHARASHTRA NURSING HOMES REGISTRATION ACT.

## CONTENTS

PREAMBLE.

SECTIONS.

1. Short title, extent and commencement.
2. Definitions.
3. Prohibition to carry on nursing home without registration.
4. Application for registration.
5. Registration.
6. Penalty for non-registration.
7. Cancellation of registration.
8. Notice of refusal or of cancellation of registration.
9. Inspection of nursing homes.
10. Income of local supervising authority.
11. Expenses of local supervising authority.
12. Penalty for offences under Act.
13. Offences by corporations.
14. Court competent to try offences under Act.
15. Indemnity to persons acting under this Act.
16. Rules.
17. By-laws.
18. Saving.

# BOMBAY ACT No. XV OF 1949[1].

## [THE MAHARASHTRA NURSING HOMES REGISTRATION ACT.]†

[*6th May 1949*]

Adapted and modified by the Adaptation of Laws Order, 1950.

Adapted and modified by the Bombay Adaptation of Laws (State and Concurrent Subjects) Order, 1956.

Amended by Bom. 42 of 1959.

Adapted and modified by the Maharashtra Adaptation of Laws (State and Concurrent Subjects) Order, 1960.

Amended by Mah. 2 of 2006.

Amended by Mah. 24 of 2012.

**An Act to provide for the registration and inspection of nursing homes in the [2][ State of Bombay] and for certain purposes connected therewith.**

WHEREAS, it is expedient to provide for the registration and inspection of nursing homes in the Province of Bombay and for certain purposes connected therewith; It is hereby enacted as follows :—

Short title, extent and commencement.

1. (*1*) This Act may be called [3][the Maharashtra Nursing Homes Registration Act.]

[4][(*2*) This section extends to the whole of the [5][ State of Maharashtra].

The remaining provisions of this Act extend to Greater Bombay, the [6][ City of Poona] as constituted under section 3 of the *Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur as constituted under the **City of Nagpur Corporation Act, 1948 and the Municipal Borough of Sholapur. The State Government may, by notification in the *Official Gazette*, direct that the said provisions shall extend to such other areas as may be specified in the notification.]

Bom. LIX of 1949. C.P.and Berar II of 1950.

(*3*) This section shall come into force at once. The [7][ State] Government may, by notification in the *Official Gizette*, direct that the remaining provisions of this Act shall come into force in any area to which the said provisions extend or may have been extended under sub-section (*2*) on such date as may be specified in the notification.

---

[1] For Statement of Objects and Reasons, *see Bombay Government Gazette*, 1949, Part-V, page 84.

† This Act was extended to that part of the State of Bombay to which immediately before the commencement of Bom. 42 of 1959, it did not extend. (*vide* Bom. 42 of 1959, s. 27).

[2] These words were substituted for the words "Province of Bombay" by Bom. 42 of 1959, s. 3.

[3] The short title was amended by Mah. 24 of 2012, s. 2, Sch, entry no. 36, w.e.f. 1-5-1960.

[4] This sub-section was substituted for the original by Bom. 42 of 1959, s. 4.

[5] These words were substituted for the words "State of Bombay" by the Maharashtra Adaptation of Laws (State and Concurrent Subjects) Order, 1960.

[6] These words were substituted for the words "Cities of Poona and Ahmedabad", *ibid*.

[7] This word was substituted for the word "Provincial" by the Adaptation of Laws Order, 1950.

* The short title of this Act was substituded as " the Maharashtra Municipal Corporation Act" by Mah. 23 of 2012, s. 4.

** This Act was repealed, *ibid*. s.7.

Definitions. **2.** In this Act, unless there is anything repugnant in the subject or context—

(*1*) "by-laws" means by-laws made by the local supervising authority;

[1][ (*1-a*) "district local board" in relation to any area other than a municipal area, means a district local board, district board, district panchayat or *Janapada Sabha* or similar local authority established under any law for the time being in force relating to the constitution of such authorities and having jurisdiction over such area;]

[2][ (*2*) "local supervising authority" means,—

(*i*) in the areas falling within the jurisdiction of the Municipal Corporation—the Health Officer of the concerned Municipal Corporation;

(*ii*) in the areas falling within the jurisdiction of the Municipal Council–— the Civil Surgeon of the District in which such Council is situated;

(*iii*) in the areas falling within the jurisdiction of a Cantonment— the Health Officer of the concerned Cantonment;

(*iv*) in the areas not falling in sub-clauses *(i)*, *(ii)* and *(iii)* above—the District Health Officer of the concerned *Zilla Parishad;*]

(*3*) "maternity home" means any premises used or intended to be used, for the reception of pregnant women or of women in or immediately after child birth;

[3][ (*3-a*) "Municipality" means a municipal corporation, municipality, municipal committee, town committee or similar local authority established under any law for the time being in force relating to the constitution of such authorities and "municipal area" means the local area within the jurisdiction of a municipality;]

(*4*) "nursing home " means any premises used or intended to be used, for the reception of persons suffering from any sickness, injury or infirmity and the providing of treatment and nursing for them and includes a maternity home; and the expression "to carry on a nursing home" means to receive persons in a nursing home for any of the aforesaid purposes and to provide treatment or nursing for them;

(*5*) "prescribed" means prescribed by rules made under this Act;

---

[1] Clause (*1-a*) was inserted by Bom. 42 of 1959, s. 5(*1*).

[2] This clause was substituted for the original by Mah. 2 of 2006, s. 2.

[3] Clause (*3-a*) was inserted by Bom. 42 of 1959, s. 5(*2*).

Bom. VI of 1912.

(*6*) "qualified medical practitioner" means a medical practitioner registered under the Bombay Medical Act, 1912 or any other law for the time being in force;

Bom. XIVof 1954.

[1][(*7*) "qualified midwife" means a midwife registered or deemed to be registered under the Bombay Nurses, Midwives and Health Visitors Act, 1954 or any other corresponding law for the time being in force;

Bom. XIV of 1954.

(*8*) "qualified nurse " means a nurse registered or deemed to be registered under the Bombay Nurses, Midwives and Health Visitors Act, 1954 or any other corresponding law for the time being in force ; ]

(*9*) "register" means to register under section 5 of this Act and the expressions "registered" and "registration" shall be construed accordingly;

(*10*) "rules" means rules made under this Act.

Prohibition to carry on nursing home without registration.

**3.** No person shall carry on a nursing home unless he has been duly registered in respect of such nursing home and the registration in respect thereof has not been cancelled under section 7:

Provided that nothing in this section shall apply in the case of a nursing home [2][ which is in existence in any area at the date of the coming into force of section 3 in that area] for a period of three months from such date or if an application for registration is made within that period in accordance with the provisions of section 4 until such application is finally disposed of.

Application for registiation.

**4.** (*1*) Every person intending to carry on a nursing home shall make every year an application for registration or the renewal of registration to the local supervising authority :

Provided that in the case of a nursing home [3][which is in existence in any area at the date of the coming into force of section 3 in that area] an application for registration shall be made within three months from such date.

(*2*) Every application for registration or the renewal of registration shall be made on such date and in such form and shall be accompanied by such fee, as may be prescribed.

Registration.

**5.** (*1*) Subject to the provisions of this Act and the rules, the local supervising authority shall, on the receipt of an application for registration, register the applicant in respect of the nursing home named in the application and issue to him a certificate of registration in the prescribed form:

---

[1] Clauses (*7*) and (*8*) were substituted for the original by Bom. 42 of 1959, s. 5(*3*).

[2] These words were substituted for the words "which is in existence at the date of the commencement of this Act", *ibid.*, s. 6.

[3] These words were substituted for the words "which is in existence at the date of the commencement of this Act", *ibid.*, s. 7.

Provided that the local supervising authority may refuse to register the applicant if it is satisfied—

(*a*) that he, or any person employed by him at the nursing home, is not a fit person, whether by reason of age or otherwise, to carry on or to be employed at a nursing home of such a description as the nursing home named in the application; or

[1][(*b*) that the nursing home is not under the management of a person who is holding a degree in medical sciences and who is resident in the home, or that there is not a prescribed proportion of qualified nurses employed in the nursing home to the number of patients in it; or]

(*c*) that in the case of a maternity home it has not got on its staff a qualified midwife; or

[2][ (*c-1*) that the area of the premises of the nursing home is less than the prescribed area;

(*c-2*) that the number of beds available in the nursing home exceeds than those prescribed;

(*c-3*) that the nursing home is owned or is under the management of a Government Medical Officer;]

(*d*) that for reasons connected with the situation, construction, accommodation, staffing or equipment, the nursing home or any premises used in connection therewith are not fit to be used for a nursing home of such a description as the nursing home mentioned in the application or that the nursing home or premises are used or are to be used for purposes which are in any way improper or undesirable in the case of such nursing home.

[3][ (*2*) A certificate of registration issued under this section shall, subject to the provisions of section 7, be in force and shall be valid until the 31st day of March of the third year next following the date on which such certificate is issued or renewed, as the case may be.]

(*3*) The certificate of registration issued in respect of a nursing home shall be kept affixed in a conspicuous place in the nursing home.

Penalty for non-registration.

[4]**[6.** Whoever contravenes the provisions of section 3, shall, on conviction, be punished with imprisonment which may extend to six months or with fine which may extend to ten thousand rupees or with both.]

---

[1] This clause was substituted for the original by Mah. 2 of 2006, s. 3 (*a*)(*i*).

[2] These clauses were inserted, *ibid*., s. 3 (*a*)(*ii*).

[3] This sub-section was substituted, *ibid.*, s. 3 (*b*).

[4] This section was substituted *ibid*., s. 4.

**7**. Subject to the provisions of this Act, the local supervising authority may at any time cancel the registration of a person in respect of any nursing home on any ground which would entitle it to refuse an application for the registration of that person in respect of that home, or on the ground that person has been convicted of an offence under this Act or that any other person has been convicted of such an offence in respect of that home. Cancellation of registration.

**8.** (*1*) Before making an order refusing an application for registration or an order cancelling any registration, the local supervising authority shall give to the applicant or to the person registered, as the case may be, not less than one calendar month's notice of its intention to make such an order, and every such notice shall state the grounds on which the local supervising authority intends to make the order and shall contain an intimation that if within a calendar month after the receipt of the notice the applicant or person registered informs the authority in writing that he desires so to do, the local supervising authority shall, before making the order, give him (in person or by a representative) an opportunity of showing cause why the order should not be made. Notice of refusal or cancellation of registration.

(*2*) If the local supervising authority, after giving the applicant or the person registered an opportunity of showing cause as aforesaid, decides to refuse the application for registration or to cancel the registration, as the case may be, it shall make an order to that effect and shall send a copy of the order by registered post to the applicant or the person registered.

(*3*) Any person aggrieved by an order refusing an application for registration or cancelling any registration may, within a calendar month after the date on which the copy of the order was sent to him, appeal to the [1][State] Government against such order of refusal. The decision of the [1][State] Government on any such appeal shall be final.

(*4*) No such order shall come into force until after the expiration of a calendar month from the date on which it was made or where notice of appeal is given against it, until the appeal has been decided or withdrawn.

**9.** (*1*) The Health Officer of the local supervising authority or the Civil Surgeon of the district in which a nursing home is situated or any other officer duly authorised by the local supervising authority or the Civil Surgeon, may, subject to such general or special orders as may be made by the local supervising authority, at all reasonable times enter and inspect any premises which are used, or which that officer has reasonable cause to believe to be used, for the purpose of nursing home, and inspect any records required to be kept in accordance with the provisions of this Act: Inspection of nursing homes.

---

[1] This word was substituted for the word "Provincial" by the Adaptation of Laws Order, 1950.

Provided that nothing in this Act shall be deemed to authorise any such officer to inspect any medical record relating to any patient in a nursing home.

(*2*) If any person refuses to allow any such officer to enter or inspect any such premises as aforesaid, or to inspect any such records as aforesaid or obstructs any such officer in the execution of his powers under this section, he shall be guilty of an offence under this Act.

Income of local supervising authority.

**10.** Any fees received under this Act shall be paid into the fund of the local supervising authority.

Expenses of local supervising authority.

**11.** Notwithstanding anything contained in any enactment in regard to any municipal or local fund; all expenses incurred by a local supervising authority under and for the purposes of this Act and the rules and by-laws may be paid out of the municipal or local fund, as the case may be.

Penalty for offences under Act.

**12.** Whoever contravenes any of the provisions of this Act or of any rule shall, if no other penalty is elsewhere provided in this Act or the rules for such contravention, on conviction, be punished with fine which may extend to[1][five thousand rupees] and in the case of continuing offence to a further fine of [2][ fifty rupees] in respect of each day on which the offence continues after such conviction.

Offences by corporations.

**13.** Where a person committing an offence under this Act is a company or other body corporate or an association of persons (whether incorporated or not), every person who at the time of the commission of the offence was a director, manager, secretary, agent or other officer or person concerned with the management thereof shall, unless he proves that the offence was committed without his knowledge or consent, be deemed to be guilty of such offence.

Court competent to try offences under Act.

**14.** No Court other than that of a Presidency Magistrate or a Magistrate of the first class shall take cognizance of or try any offence under this Act.

Indemnity to persons acting under this Act.

**15**. No suit, prosecution or other legal proceeding shall be instituted against any person for anything which is in good faith done or intended to be done under this Act, rules or by-laws.

Rules.

**16.** (*1*) The [3][ State] Government may, by notification in the *Official Gazette*, make rules to carry out all or any of the purposes of this Act.

---

[1] These words were substituted for the words "fifty rupees" by Mah. 2 of 2006, s. 5(*a*).

[2] These words were substituted for the words "fifteen rupees", *ibid.*, s. 5(*b*).

[3] This word was substituted for the word "Provincial" by the Adaptation of Laws Order, 1950.

(*2*) Without prejudice to the generality of the foregoing provisions such rules may prescribe—

(*a)* the form of the application to be made under section 4,

(*b*) the date on which an application for registration or renewal of registration to be made and the fees to be paid for such registration or renewal of registration:

[1][Provided that, the State Government may prescribe different rates of fees for registration of nursing homes, having regard to the area in which such nursing home is situated, the number of beds therein, the number of specialisations offered in such nursing home.]

(*c*) the form of the certificate of registration to be issued under section 5,

(*d*) for any other matter for which no provision has been made in this Act, and for which provision is, in the opinion of the [2][State] Government, necessary.

(*3*) The power to make rules under this section shall be subject to the condition of previous publication in the *Official Gazette*.

**17.** (*1*) The local supervising authority may make by-laws not inconsistent with this Act or rules— By-laws.

(*a*) prescribing the records to be kept of the patients received into a nursing home, and in the case of the maternity home, of miscarriages, abortions or still births occuring in the nursing home and of the children born therein and of the children so born who are removed from the home otherwise than to the custody or care of any parent, guardian or relative;

(*b*) requiring notification to be given of any death occuring in the nursing home.

(*2*) Any by-law made by a local supervising authority under this Act may provide that a contravention thereof shall be punishable—

(*a*) with fine which may extend to fifty rupees; or

(*b*) with fine which may extend to fifty rupees and in the case of a continuing contravention, with an additional fine which may extend to fifteen rupees for every day during which such contravention continues after conviction for the first such contravention; or

(*c*) with fine which may extend to fifteen rupees for every day during which the contravention continues after the receipt of a notice from the local supervising authority by the person contravening the by-law requiring such person to discontinue such contravention.

---

[1] This proviso was inserted by Mah. 2 of 2006, s. 6.

[2] This word was substituted for the word "Provincial" by the Adaptation of Laws Order, 1950.

(*3*) No by-law made by the local supervising authority shall come into force until it has been confirmed by the [1][State] Government with or without modification.

(*4*) All by-laws made under this section shall be published in the *Official Gazette.*

Saving. **18.** Nothing in this Act shall apply to—

(*i*) any nursing home carried on by Government or a local authority or by any other body of persons approved by the [1][State] Government in this behalf; and

(*ii*) any asylum for lunatics or patients suffering from mental diseases, within the meaning of the Indian Lunacy Act, 1912. IV of 1912.

[1] This word was substituted for the word "Provincial" by the Adaptation of Laws Order, 1950.